ग्रामीण भागातील सायंकाळी प्रसिद्ध होणारे वृत्तपत्र

Reg.No.MHMAR/26/A2477

email-bhikachavan781@gmail.com

दैनिक

# सायं मंथन

संपादक-चव्हाण भिका हरचंद 9503726229

वर्ष : १ ले | अंक : ४५ वा | मंगळवार ०१ सप्टेंबर २०२६ | पाने :४ | किंमत : २ रूपये

## पावसाने ओढ दिल्याने जिल्ह्यात दुष्काळाचे सावट, शेतकरी संकटात

### धुळे जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करण्याची शानाभाऊ सोनवणे यांची मागणी

धुळे /सायंमंथन :- पावसाने ओढ दिल्याने खरीप हंगामातील पिकांवर संकटाचे सावट निर्माण झाले असून धुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या चिंतेत दिवसेंदिवस वाढ होत आहे. जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीची तातडीने पाहणी करून धुळे जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करावा आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे शानाभाऊ सोनवणे यांनी केली आहे.शिंदखेडा तालुक्यातील वरझडी परिसरातील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन सोनवणे यांनी १ सप्टेंबर रोजी प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी पावसाअभावी पिकांची झालेली अवस्था आणि शेतकऱ्यांच्या अडचणी त्यांनी जाणून घेतल्या. गेल्या काही आठवड्यांपासून पावसाने पाठ फिरवल्याने अनेक भागांमध्ये खरीप पिकांची वाढ खुंटली आहे. कपाशीच्या पिकावर लाल्या रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे.धुळे जिल्ह्याचे हवामान सर्वसाधारणपणे उष्ण व कोरडे असून जिल्ह्यातील शिंदखेडा, धुळे आणि साक्री हे भाग दुष्काळी परिस्थितीला संवेदनशील मानले जातात. त्यामुळे सध्याच्या पावसाच्या खंडाचा शेतीवर होणारा परिणाम गांभीर्याने घेण्याची आवश्यकता असल्याचे सोनवणे यांनी सांगितले.शेतकऱ्यांनी बियाणे, खते, कीटकनाशके, मशागत आणि मजुरीवर मोठा खर्च केला आहे. मात्र पिके वाया जाण्याची परिस्थिती निर्माण झाल्यास शेतकऱ्यांवर कर्जाचा बोजा आणखी वाढणार आहे. त्यामुळे शासनाने केवळ कागदी अहवालांवर अवलंबून न राहता महसूल व कृषी विभागाच्या यंत्रणेमार्फत प्रत्यक्ष शेतपातळीवर पाहणी करावी, अशी मागणी करण्यात आली.नुकसानग्रस्त पिकांचे तातडीने पंचनामे करून हेक्टरी भरीव आर्थिक मदत द्यावी, तसेच शेतकऱ्यांना कर्ज, वीज, पाणी आणि शेतीमालाच्या दराबाबत दिलासा देण्यासाठी विशेष उपाययोजना कराव्यात,



अशी मागणी सोनवणे यांनी केली.दरम्यान, शिंदखेडा तालुक्याचा नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अर्थात 'पोकरा' योजनेत समावेश करण्याची मागणीही त्यांनी पुन्हा केली. शासनाने धुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहून तातडीने निर्णय न घेतल्यास शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. तसेच शेतकऱ्यांच्या हक्कासाठी 'शिंगाडे मोर्चा' काढण्यात येईल, असा इशारा सोनवणे यांनी दिला.धुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आता शासनाच्या मदतीची प्रतीक्षा लागली असून प्रशासन या मागण्यांवर काय निर्णय घेते, याकडे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## तापी पुल बनला मृत्यूचा सापळा,पुलाच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर चार दिवसांत

## ५ जणांनी उडी घेतल्याचा संशयदोघांचे मृतदेह सापडले,तिघांचा शोध सुरू,

शिरपूर/सायंमंथन :- मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावरील सावळदे येथील तापी नदीवरील पूल सध्या नागरिकांच्या सुरक्षित प्रवासाचे माध्यम राहण्याऐवजी चिंतेचे केंद्र बनला आहे. अवघ्या चार दिवसांत पाच जणांनी पुलावरून तापी नदीपात्रात उडी घेतल्याचा संशय व्यक्त होत असून, यापैकी दोघांचे मृतदेह सापडले आहेत, तर तिघांचा शोध सुरू आहे. सलग घडणाऱ्या या घटनांमुळे पुलाच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.शिरपूर शहरासह परिसरातील अनेक गावांना जोडणाऱ्या या पुलावर दिवस-रात्र मोठी वर्दळ असते. दररोज हजारो नागरिक आणि वाहनांची ये-जा सुरू असते. मात्र, एवढ्या महत्त्वाच्या पुलावर नागरिकांच्या सुरक्षेसाठी आवश्यक त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना अद्यापही प्रभावीपणे करण्यात आलेल्या नाहीत. मजबूत सुरक्षा जाळीचा अभाव हा सर्वात गंभीर मुद्दा ठरत आहे.पुलावर एखादी दुचाकी किंवा वाहन बेवारस अवस्थेत दिसले की नागरिकांची धाकधूक वाढते. वाहनाजवळ संबंधित व्यक्ती दिसत नसल्यास तत्काळ पोलिसांना माहिती दिली जाते. त्यानंतर तापी नदीपात्रात शोधमोहीम सुरू केली जाते. पोलिसांसह आपत्ती व्यवस्थापन पथक आणि स्थानिक नागरिकांनाही शोधकार्यात उतरावे लागते.चार दिवसांत पाच जणांच्या उडीच्या संशयास्पद घटना समोर येणे ही प्रशासनासाठी धोक्याची घंटा मानली जात आहे. दोन मृतदेह सापडले असून तिघांचा शोध सुरू असताना पुलावरील सुरक्षा व्यवस्थेचे अपयश नेमके किती जीव गेल्यानंतर प्रशासनाच्या लक्षात येणार? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत.पुलाला सुरक्षा जाळी बसविण्याची मागणी अनेक वर्षांपासून होत आहे. निधी मंजूर झाल्याच्या चर्चा यापूर्वी झाल्या असून याबाबत बातम्याही प्रसिद्ध झाल्या. मात्र, प्रत्यक्षात पुलावर आजही मजबूत जाळी दिसत नसल्याने निधी मंजूर झाला असेल तर काम कुठे अडले आहे? असा प्रश्न उपस्थित होत आहे.निविदा प्रक्रिया झाली का? कामाचा आदेश कधी देण्यात आला? सुरक्षा जाळी



बसविण्याची जबाबदारी कोणत्या विभागाची आहे? काम प्रत्यक्षात कधी सुरू होणार? या प्रश्नांची स्पष्ट उत्तरे प्रशासनाने जनतेसमोर द्यावीत, अशी मागणी होत आहे.पुलावर मजबूत सुरक्षा जाळी, पुरेशी प्रकाशयोजना आणि सीसीटीव्ही कॅमेरे तातडीने बसविण्याची गरज आहे. दुर्घटना घडल्यानंतर नदीपात्रात शोधमोहीम राबविण्यापेक्षा दुर्घटना टाळण्यासाठी आधीच उपाययोजना करणे अधिक महत्त्वाचे आहे.'जीव गेल्यानंतर पंचनामा आणि शोधमोहीम' करण्याऐवजी 'जीव वाचविण्यासाठी आधीच सुरक्षा' का नाही? हा नागरिकांचा थेट सवाल आहे. तापीवरील हा पूल नागरिकांच्या सुरक्षित प्रवासासाठी आहे; तो मृत्यूचा सापळा बनू नये. प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी आता आश्वासनांपलीकडे जाऊन पुलाच्या सुरक्षेचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा, अशी जोरदार मागणी होत आहे.